कुणीतरी पुढे गेला म्हणून, द्वेष करत बसण्यापेक्षा, आपण मागे का राहीलो? हा विचार करा आणि चालत राहा. स्पर्धा स्वतःशी करा जगाशी नाही

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ

# लोकआरंभ

dainiklokaarambh@gmail.com

LOK AARAMBH | संपादक:राहुल मारोतीराव वाईकर | कार्यकारी संपादक गोकुळ इंगोले

बीड/महाराष्ट्र वर्ष ३ रे | बुधवार २६ मार्च २०२५ | अंक १०५ ● पाने ४ | RNI/MAHMAR/2022/84215 | किंमत २ रु







# शिंदे साहेब तुम्ही सुद्धा हे ऐका ! वाघाची शिकार करणाऱ्याला दिसता क्षणी ठोका!

## मिलिंद नार्वेकर लक्ष्य वेधत सभागृहात जोरदार चर्चा



### वाघांना वाचण्यासाठी काहीतरी करावं,

**वाघांना वाचण्यासाठी काहीतरी करावं, असं म्हणत आपला प्रश्न मिलिंद नार्वेकर यांनी मांडला. वाघ वाचवण्यासाठी सरकारने ठोस पावलं उचलण्याची मागणी नार्वेकर यांनी केली. गेल्या काही दिवसात वाघाची शिकार करण्याचे प्रकार समोर आले आहेत.**

### राज्य सरकारची भूमिका काय?

राज्यात वाघाची तस्करी सुरू असून टिपेश्वर अभयारण्यातील पीसी वाघिणीची तस्करी करण्यासाठी तिच्या गळ्यात तारेचा फास अडकल्याची घटना ताजी असताना पवनार येथे पिकेडी टी- ३३ च्या वाघिणीच्या गळ्यातही असाच फास आढळला. नार्वेकर यांनी वाघाच्या शिकार आणि तस्करीच्या विषयावर सभागृहाचे लक्ष वेधले. त्यामुळे राज्यात अशा प्रकारचा कायदा करता येईल का? याचा आढावा घेऊन निर्णय घेऊ असं उत्तर वनमंत्री गणेश नाईक यांनी दिले.



शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे सचिव आणि विधान परिषदेचे आमदार मिलिंद नार्वेकर यांनी सभागृहात मोठी मागणी केली. त्यांनी लक्षवेधी मांडत सभागृहाचे लक्ष वेधले. त्याचवेळी ते म्हणाले, शिंदे साहेब माझं ऐका, आपल्या दोघांना मिळून काही तरी करावं लागेल. त्यांच्या या मिश्किल शेऱ्यानंतर सभागृहात जोरदार चर्चा झडली. काय आहे अपडेट? काय मांडली लक्षवेधी? वाघाची शिकार तस्करी करणाऱ्याला दिसता क्षणी ठोका, आसामच्या धर्तीवर राज्यात कठोर कायदा करा, आमदार मिलिंद नार्वेकर यांनी सभागृहात लक्षवेधी मांडली. शिंदे साहेब तुम्ही सुद्धा हे ऐका, आपल्या दोघांना यामध्ये मिळून काहीतर करावं लागेल, असे नार्वेकर म्हणाले. येथेच आपण कितीतरी वाघ बसले आहोत असं म्हणतो. आता याच आपल्या वाघांनी एकत्र येऊन या वाघांना वाचण्यासाठी काहीतरी करावं, असं म्हणत आपला प्रश्न मिलिंद नार्वेकर यांनी मांडला. वाघ वाचवण्यासाठी सरकारने ठोस पावलं उचलण्याची मागणी नार्वेकर यांनी केली. गेल्या काही दिवसात वाघाची शिकार करण्याचे प्रकार समोर आले आहेत. तर काही भागात वाघाची तस्करी करण्याचे प्रकारही समोर आले आहेत. याप्रकारे आसाम मध्ये गेंड्याच्या तस्करी करणाऱ्या टोळी विरोधात कठोर कायदा करण्यात आला आणि दिसताक्षणी गोळ्या घालायचा हा कायदा करण्यात आला.

# दारूबंदीसाठी हिवरापहाडीचे ग्रामस्थ आक्रमक,जागर प्रतिष्ठान ताकतीने सोबत



बीड - तालुक्यातील हिवरा पहाडी या गावात खुलेआम अवैध दारू विक्री केली जाते त्यामुळे गावातील व परिसरातील युवक दारूच्या आहारी जाऊन आयुष्य उद्धस्त करून घेत आहेत तसेच कित्येकांचे संसार दारू मुळे तुटले आहेत ,विक्री करण्यांना वारंवार समज देऊन ही जैसे थे सुरूच आहे त्यामुळे आज पिंपळनेर पोलीस स्ट ेशन येथे सहायक पोलिस अधीक्षक यांना निवेदन देखील देण्यात आले गावात अवैध्य दारू विक्री करणाऱ्यांवर लवकरात लवकर कार्यवाही कारवाही अन्यथा तीव्र आंदोलनाचा इशारा यावेळी जागर प्रतिष्ठानचे भरत खरात यांच्यासह ग्रामस्थानी दिला आहे निवेदन देते वेळी भरत खरात,नामदेव शेळके,विशाल शिंदे,किरण पांढरे,विनोद गिरी, सविता लांडगे, मीना पाट ेकर,सत्यभामा शेळके,कमलबाई दगु ंडे,सखुबाई शेळके,मुक्ताबाई गोरे, कस्तुरबाई गोरे, हवसाबई शिंदे,राधा गोरे,सिंधुबई शिंदे, मर्करणा आणेराव आदी.महिला देखील मोठ्या संख्येने उपस्थित होत्या


# इंदूरमध्ये सार्वजनिक टॉयलेटच्या बाहेर कुणाल कामराचे फोटो लावले, संजय राऊत म्हणाले की,' ये तो अपुन जैसा...



महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर विडंबनात्मक पॅरीडी साँग्ज गायल्याने स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याच्या खार येथील स्टुडिओ सोमवारी सायंकाळी शिवसैनिकांनी तोडून टाकला आहे. त्यानंतर कुणाल कामरा याच्यावर विविध ठिकाणी शिवसैनिकांनी निदर्शने केली आहे. कुणाल कामरा याने तामिळनाडूतून सोशल मिडीयावर ट्वीट टाकीत आणखीन खिजवले आहेत. यानंतर शिवसेनेच्या कार्यकर्त्यांनी आता मध्य प्रदेशातील इंदूर शहरात सार्वजिनिक टॉयलेटवर कुणाल कामरा याचे पोस्ट लावत त्याला चपलांचा मारा केला आहे.

# हिंसाचाराच्या प्रकरणी नागपुरात सोशल मीडिया वापरण्यावर निर्बंध

## पोलिसांनी रिल्स बनवणाऱ्यांना दिली सक्त ताकीद



नागपुरात काही दिवसांपूर्वी मोठा हिंसाचार उसळला होता. यानंतर पोलिसांनी ५० दंगलखोरांवर गुन्हा दाखल करण्यात आले आहेत. याप्रकरणी फहीम खानलाही १८ मार्चला अटक करण्यात आली आहे. नागपूर हिंसाचार प्रकरणी फहीम खान हा मुख्य सूत्रधार असल्याचा आरोप करण्यात येत आहे. फहीम खानने जमावाला भडकवून हिंसा घडवल्याचा गंभीर आरोप त्याच्यावर करण्यात आला आहे. सध्या फहीम खान हा कोठडीत आहे. या हिंसाचार प्रकरणातील मुख्य सूत्रधार फहीम खानच्या घरावर बुलडोझर कारवाई करण्यात आली. नागपुरात झालेल्या हिंसाचाराच्या घटनेनंतर आता पोलीस आयुक्तांनी काही सूचना जारी केल्या आहेत. नागपुरात झालेल्या हिंसाचारानंतर आता पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी पत्रकारांशी संवाद साधला. यावेळी नागपूरचे पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी सोशल मीडियाचा वापर करणाऱ्यांना विविध सूचना दिल्या. तसेच रिल्स बनवणाऱ्यांनाही त्यांनी सक्त शब्दात ताकीद दिली आहे. युट्यूबवर आमची नजर असणार नागपूर हिंसाचाराच्या घटनेनंतर युट्यूबवर लोकांना माहिती देताना हिंसाचाराचे व्हिडीओ पोस्ट करू नये, जेणेकरून दोन समाजात तेढ निर्माण होईल. कोणाच्या प्रतिष्ठेला धक्का पोहोचेल असे व्हिडीओ पोस्ट करू नये. युट्यूबवर आमची नजर असणार आहे. यापुढे अशा पद्धतीचे काही असल्यास कारवाई केली जाणार आहे. यामध्ये 114 च्या पेक्षा अधिक लोकांना ताब्यात घेतलेले आहे. यातील 13 लोकांविरोधात तक्रार दाखल केली आहे. तसेच आणखी लोकांना अटक करण्यात येत आहे. त्यांच्यावर सोशल मीडियाच्या माध्यमातून वेगळे गुन्हे दाखल केले आहेत, अशी माहिती पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल यांनी दिली. सोशल माध्यमांना नजर ठेवण्यासाठी वेगळे लक्ष ठेवू नये. काही युट्युबवर कारवाई केली जाणार आहे. ज्या गुन्हेगारांवर कडक कारवाई झाली पाहिजे. त्यासाठी आम्ही गुन्हे दाखल केले आहेत. अवैध बांधकाम असल्यास नियमितपणे कारवाई करत असतो. गुन्हेगाराची जात किंवा धर्म नसते. ज्या लोकांचे नाव निष्पन्न होईल, त्यावरही अशाच पद्धतीची कडक कारवाई केली जाईल, असेही पोलीस आयुक्त रवींद्र कुमार सिंघल म्हणाले.



# आ.नमिताताईकडून डॉ.थोराताची विकेट

## इतका मोठा भ्रष्टाचार एकटा कोणीच करु शकत नाही झालेल्या भ्रष्टाचारात डॉ.थोरातांचा आका कोण आहे

केजच्या कर्तव्यदक्ष आमदार नमिता ताई मु ंदडा यांनी लक्षवेधी मांडत त्यावेळी असलेले आणि आताही जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक असलेले डॉक्टर अशोक थोरात यांनी कोरोना काळात केलेल्या भ्रष्टाचाराची पोल खोल केली आहे. नमिता ताई यांनी मांडलेला मुद्दा रास्त आहे मात्र या प्रकरणाची खोलपर्यंत चौकशी होण्याची गरज असून यामध्ये कोण कोण आहेत या सगळ्यांची पाळेमुळे काढली गेली पाहिजेत. डॉक्टर अशोक थोरात यांनी त्याकाळी भ्रष्टाचार केला असेल तर यामध्ये ते एकटे नसतील यामध्ये अनेकांचा समावेश असू शकतो त्यामुळे या सगळ्यांची चौकशी झाली पाहिजे आणि त्यामध्ये दोषी असलेल्यावर कारवाई झाली पाहिजे. कोरोना काळामध्ये संपूर्ण जगामध्ये आणि देशासह महाराष्ट्रावरही संकट आले होते. त्यावेळी आरोग्य सेवा हीच सर्वांची प्राधान्य होती म्हणून शासनाने सर्वसामान्य जनतेच्या सोयीसाठी शासनाने प्रचंड प्रमाणात आरोग्य सुविधा देण्याची सुरुवात केली आणि याच काळामध्ये अनेक अधिकाऱ्यांनी शासनाच्या पैशाचा गैरवापर केल्याचे समोर आले आहे. कोरोनाच्या नावाखाली प्रत्येक जिल्ह्याला आरोग्य सुविधा देण्यासाठी कोट्यावधीचा निधी आला होता, त्यामध्ये ज्यांच्या हातात निधी पडला त्या अधिकाऱ्यांनी आपापल्या पद्धतीने भ्रष्टाचार केल्याची प्रकरणे समोर आली. रेमडीसीवर सारख्या इंजेक्शनच्या माध्यमातून अनेक जिल्ह्याच्या आरोग्य अधिकाऱ्यांनी आणि जिल्हा शल्य चिकित्सकांनी भ्रष्टाचार केले. त्याच अनुषंगाने त्या वेळचे बीड जिल्हा रुग्णालयाचे जिल्हा शल्य चिकित्सक असलेले डॉक्टर अशोक थोरात यांच्यावरही आरोप झाले.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २६ मार्च २०२५
https://lokaarambh.com



# संपादकीय

## करिअरची दिशा ठरवा

आपल्याला विविध क्षेत्रांत करिअरच्या संधी असतात. त्यासाठी योग्य वेळी आपल्याला आपल्या करिअरची दिशा ठरवावी लागेल. एकदा संधी गेली की परत येत नाही. लोकप्रिय क्षेत्र आणि जास्त पगार कुठे मिळतो याच्या आपण शोधात असतो. सध्या ही परिस्थिती बदललेली आहे. तेव्हा आता जरी दहावी आणि बारावीची परीक्षा संपल्याने मोकळा श्वास घेऊ नंतर बघू करिअरचे असे न करता परीक्षेचा निकाल लागण्याच्या पूर्वी आपल्याला कोणत्या शाखेत प्रवेश घ्यायचा आहे. नंतर आपण कोणती पदवी संपादन करणार आहोत. त्यानंतर रोजगाराच्या संधी कोणत्या आहेत याचा विचार करून आपल्या करिअरची दिशा ठरवावी लागेल त्यासाठी थोडक्यात घेतलेला वेध. जीवनात स्वतःचे करिअर घडविण्यासाठी त्याला योग्य दिशा द्यावी लागते. जर दिशा चुकली की काय होते याची सर्वांना कल्पना आहे. तेव्हा विद्यार्थीदशेतच विद्यार्थ्यांना आपल्या करिअरची दिशा ठरवावी लागेल. प्रत्येकाच्या जीवनात दहावी आणि बारावीची बोर्डाची परीक्षा अतिशय महत्त्वाची असते. तेव्हा प्रत्येकाचे करिअर या बोर्डाच्या परीक्षेवर अवलंबून असते. १५ मेच्या आत बोर्डाच्या परीक्षेचा निकाल जाहीर होईल. यात कोणाला यश तर काहींना अपयश, काहीजण विशेष श्रेणीत पास तर काहींना अपेक्षेप्रमाणे खूपच कमी गुण त्यामुळे निकाल लागल्यानंतर नेमके काय करावे याच्या शोधात असतात. तेव्हा आपल्याकडे वेळ सुद्धा नसतो. यामुळे आपली इच्छा असून सुद्धा आवडीच्या अभ्यासक्रमापासून वंचित राहतो. याचा परिणाम आपल्या आवडीचे क्षेत्र नसल्यामुळे आपण अभ्यासाकडे दुर्लक्ष करतो, यामुळे आपण त्यामध्ये अयशस्वी होतो. नंतर आपण ओरडत बसतो की, आपल्या करिअरची दिशा चुकली. तेव्हा दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षेच्या निकालाची वाट न पाहता विद्यार्थ्यांनी आपल्या करिअरची दिशा ठरवावी. म्हणजे निकाल लागल्यावर योग्य अभ्यासक्रमाला पसंती देता येईल. आता दहावी आणि बारावीच्या बोर्डाच्या परीक्षा संपल्यामुळे विश्रांती न घेता आपल्या करिअरच्या दृष्टीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. आपले करिअर ठरवताना स्वतःची आवड आणि आपल्याकडे असलेले कौशल्य याचा विचार करून करिअरची निवड करावी. त्या आनुषंगाने आपल्या विभागात किंवा जवळपास ज्या शिक्षण संस्था असतील त्यांना भेट देऊन त्या अभ्यासक्रमाचा अभ्यासक्रम व प्रवेश प्रक्रिया समजून घेतली पाहिजे. हल्ली अनेक ठिकाणी ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया असते. त्यात सीईटी परीक्षा यामुळे विद्यार्थ्यांचा ताण वाढत आहे. विरारमध्ये तर बारावीच्या काही प्रश्नपत्रिका जळल्यामुळे निश्चितच त्याचा परिणाम निकालावर होणार आहे. असे असले तरी शेवटी सरासरी गुण दिले जातात याची सर्व विद्यार्थ्यांना माहिती आहे. तेव्हा आपल्या करिअरची दिशा ठरविण्यासाठी आतापासून करिअरच्या शोधात असणे आवश्यक आहे. विद्यार्थ्यांनी, आपले ध्येय काय आहे हे ओळखून नवनवीन कौशल्ये आत्मसात केली पाहिजेत. त्यासाठी वेगवेगळ्या शिक्षण संस्थांमध्ये जाऊन त्यांची मदत घ्यावी. यामध्ये व्यावसायिक शिक्षण संस्था, उद्योग मार्गदर्शन केंद्र, रोजगार मार्गदर्शन केंद्र आणि विद्यापीठ मार्गदर्शन केंद्र यांची मदत घेतली पाहिजे. त्यामुळे विविध अभ्यासक्रम आणि रोजगाराच्या संधी यांची कल्पना येते. काही ठिकाणी निकाल लागल्यानंतर करिअरची दिशाफ या शीर्षकाखाली चर्चासत्राचे आयोजन केले जाते. त्यासाठी विविध क्षेत्रातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन आयोजित करण्यात येते. तेव्हा शिक्षण संस्थांनी विद्यार्थ्यांच्या करिअरच्या दृष्टीने जरून चर्चासत्राचे आयोजन करण्यात यावे. मात्र ते बोर्डाच्या निकालापूर्वी करावे. त्यामुळे विद्यार्थ्यांना अधिक उत्तेजन मिळते. तसेच करिअरची दिशा ठरविल्याने आपले ध्येय निश्चित होते. त्याप्रमाणे आपण पुढे जाण्याचा प्रयत्न करीत असतो. एक प्रकारे मनावरचा ताण कमी होण्याला मदत होते. यामुळे आपल्या कारकिर्दीला सुरुवात होऊन आपले लक्ष आपल्या ध्येयावरती केंद्रित करता येते. तसेच पुढे निर्माण होणाऱ्या अडचणींवर सहज मात करता येते. यामुळे आपल्याला खरी प्रेरणा मिळून आपला आत्मविश्वास वाढण्याला मदत होते. याचा परिणाम आपल्याला कठोर परिश्रम घेण्याची जिद्द निर्माण होते. त्याचप्रमाणे आपल्याला निर्णय घेणे सुद्धा सोपे जाते. आपल्या पसंतीप्रमाणे ध्येय साध्य करायचे असल्याने आपली जबाबदारी सुद्धा वाढते. त्यामुळे अधिक उत्साहाने काम करण्यास सक्रिय होतो. त्याआधी आपल्या आवडीच्या ध्येयावर चिंतन करणे गरजेचे आहे. त्यामुळे आपले ध्येय साध्य करणे अधिक सुलभ होऊन आपली प्रगती करता येते. यात काही वेळा बदल करणे गरजेचे असते. त्यानुसार बदल करायला शिका. नक्कीच त्यातून नवीन चांगला बदल झालेला दिसून येईल. यासाठी महत्त्वाकांक्षा अधिक महत्त्वाची असते. त्यासाठी आपल्या मनावर ठाम राहायला हवे. त्यासाठी ध्येयाच्या चांगल्या वाईट परिणामाचा अभ्यास करायला हवा. तेव्हा काही परिस्थिती गृहीत धरून ध्येय स्वीकारता आले पाहिजे किंवा ध्येय जुळवून घेता आली पाहिजेत. त्यात आपलाच विजय असतो हे मात्र प्रत्येक विद्यार्थ्यांनी लक्षात ठेवायला हवे. तेव्हा ध्येय निश्चित करण्यापूर्वी विचार करून निर्णय घ्यावा. शेवटी आपल्या करिअरचा प्रश्न असतो. पुढे निर्माण होणाऱ्या प्रश्नांना हसत हसत सामोरे जाण्याची जिद्द निर्माण झाली पाहिजे. तरच आपले करिअर आपण घडवू शकतो. राज्यात आज कंत्राटी हंगामी कर्मचाऱ्यांना सुद्धा वेळेवर पगार मिळत नसल्यामुळे पालकमंत्र्यांना साकडे घालण्याची वेळ आली आहे.

# बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था चाळणी झालेल्या रस्त्यांवर अजितदादा अवतरले मुखवटे घालून लक्ष्यवेधी आंदोलन :- डॉ.गणेश ढवळे

बीडः- ( दि.२४ )बीड शहरांतर्गत रस्त्यांची दुरावस्था झाली असुन ठिकठिकाणी पडलेले जीवघेणे खड्डे,वाळुमिश्रित खडीचा धुराळा उडत असुन अपघातांची संख्या वाढली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे. त्यामुळे बीड शहरातील ११० कोटी रुपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकडे वर्षभरापूर्वी पाठविण्यात आलेला प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यास तातडीने मंजुरी देऊन निधी उपलब्ध करून देण्यात यावा या प्रमुख मागणीसह धुळे ते सोलापूर रस्त्यावरील खड्डे कायमस्वरूपी बुजवुन रखडलेले दुभाजकांचे काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत. बीड ते अहिल्यानगर मार्गाचे काम संथगतीने होत असुन प्रमुख शासकीय कार्यालये असणा-या रस्त्यांवर गर्दी होत असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे या मागण्यांसाठी सामाजिक सामाजिक कार्यकर्ते तथा मुख्य प्रचार प्रमुख बीड जिल्हा माहिती आधिकार कार्यकर्ता महासंघ महाराष्ट्र राज्य डॉ.गणेश ढवळे लिंबागणेशकर यांच्या नेतृत्वाखाली दि.२४ वार सोमवार रोजी वाजता कारंजा टॉवर ते छत्रपती शिवाजी महाराज चौक ते नगरपरिषद बीड कार्यालय अजितदादा पवार यांचे मुखवटे घालून चाळण झालेल्या रस्त्याची पाहणी करत लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले.यावेळी आंदोलनात शेख युनुस, रामनाथ खोड,सुदाम तांदळे, मुबीन शेख,, शेख मुस्ताक, बीड जिल्हाध्यक्ष इंटक रामधन जमाले




आदी सहभागी होते. मुख्याधिकारी नगरपरीषद बीड निता अंधारे यांच्या मार्फत उपमुख्यमंत्री तथा वित्त व नियोजन मंत्री तथा पालकमंत्री बीड अजितदादा पवार यांना निवेदन देण्यात आले.

सविस्तर माहितीस्तव

बीडमधील १७ मुख्य रस्ते मंजुरीचा प्रस्ताव लालफितीत अडकला असुन त्यांना मंजुरी देऊन निधी देण्यात यावा.

बीड नगर पालिकेने एक वर्षापूर्वी बीड शहरातील ११० कोटी रूपयांच्या ४० फुट रूंदीच्या १७ मुख्य रस्त्यांच्या मंजुरीसाठी महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाअभियान अंतर्गत राज्याच्या नगरविकास विभागाकडे पाठवलेला प्रस्ताव लालफीतीत अडकला आहे. शहरातील नगर रोड ते पालवण चौक, डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुतळा ते संतोषीमाता मंदिर, राजुरी वेस -बलभीम चौक -माळीवेस , बलभीम चौक ते दगडी पुल,थिगळे कॉम्प्लेक्स ते जालना रोड, जिजामाता चौक ते मसरतनगर अशा एकुण शहरातील १७ अत्यंत महत्त्वाच्या प्रमुख रस्त्यांचा प्रस्ताव वर्षभरापूर्वी बीड नगरपालिकेने नगर विकास विभागाकडे पाठविला आहे.१७ रस्ते ४० फुट रूंदीचे होणार असुन त्यासाठी ११० कोटी रुपये महाराष्ट्र सुवर्ण जयंती नगरोत्थान महाभियान योजनेंतर्गत होणार आहेत.

बीड शहरातील रस्त्यांची दुरावस्था झाली असुन चाळणी झालेल्या रस्त्यावरून वाहनधारकांना कसरत करावी लागत आहे.शहरात वर्दळीचा असलेला छत्रपती शिवाजी महाराज चौक ते बशीरगंज ते कारंजा टावर या रस्त्यावर ठिकठिकाणी खड्डे पडले असुन वाळु मिश्रित खडीचा धुरळा उडत आहे. वाहनांचे अपघात होत आहेत.त्यामुळे तातडीने प्रस्ताव मंजूर करून रस्त्यांसाठी निधी देण्यात यावा.

धुळे ते सोलापूर शहरांतर्गत रस्त्यांवरील खड्डे बुजवून दुभाजकांचे अर्धवट काम पूर्ण करून साईडपंखे भरण्यात यावेत

शहरातील धुळे ते सोलापूर राष्ट्रीय महामार्गावर बार्शी नाका ते राष्ट्रवादी भवन पर्यंत मागील अनेक वर्षांपासून मोठमोठे जीवघेणे खड्डे पडले असुन या खड्ड्यात वाहने आदळुन अपघातात अनेकांना आपला जीव गमवावा लागला आहे. तर या मार्गावरील जालना रोड वरील दुभाजकांचे काम अर्धवट असुन दुभाजकांसाठी जागा सोडण्यात आली असुन त्याठिकाणी माती टाकण्यात आली आहे.त्यामुळे रस्ता ओलांडताना वाहनांची चाके फसुन अपघाताच्या घटना घडत आहेत.तर दुसरीकडे महामार्गावरील मुख्य सिमेंट रस्त्याच्या बाजुचे साईडपंखे भरण्यात आले नसुन दुचाकी वाहनचालकांचे घसरून पडण्याचे प्रमाण वाढले आहे त्यामुळे रखडलेली कामे तातडीने पूर्ण करण्यात यावीत.

इ) मागणी क्रमांक ३

बीड ते अहिल्यानगर महामार्गाचे बीड शहरातील काम संथगतीने असुन जलदगतीने पुर्ण करण्यात यावे

बीड शहरातील मुख्य रस्ता असलेल्या बीड ते अहिल्यानगर रस्त्याची दुरावस्था झाली आहे. अनेक वर्षांपासून या रस्त्याच्या दुरुस्तीची मागणी केल्यानंतर या रस्त्याच्या कामाला सुरुवात झाली. मात्र काम करणा-या ठेकेदार यंत्रणेने नियोजन शून्य काम केल्याने दीड वर्ष लोटूनही शहरातील दोन किलोमीटर अंतराचा रस्ता अद्याप पूर्ण झालेला नाही. बालेपीर पासून छत्रपती शिवाजी महाराज पुतळ्यापर्यंत रस्ता पूर्ण झाला असला तरी काही भागातील खड्डे ,रस्त्यांचे जोड कायमच आहेत. या ठिकाणी खडी, धुराळा उडून वाहन चालकांना त्रास होतो. या रस्त्यावर जिल्हा न्यायालय, समाज कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय, बांधकाम विभागाचे कार्यालय ,मुख्य प्रशासकीय इमारत अशी ६६ शासकीय कार्यालय असल्याने दुचाकीची वाहतूक मोठी आहे. त्यामुळे कायम गर्दी असते त्यामुळे संथगतीने चालणारे रसत्याचे काम जलदगतीने पूर्ण करण्यात यावे.

# तेजस्वी सन्मान पुरस्कार सोहळा उत्साहात संपन्न

ठाणे : तेजस्वी फाउंडेशन, ठाणे तर्फे मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे येथे तेजस्वी सन्मान पुरस्कार सोहळा २०२५ मोठ्या उत्साहात पार पडला. समाजसेवा, उद्योजकता, साहित्य आणि शिक्षण क्षेत्रात भरीव योगदान देणाऱ्या व्यक्तींना या सोहळ्यात गौरविण्यात आलं. तेजस्वी फाउंडेशन ही संस्था मागील दशकभरापासून अनेक सामाजिक उपक्रम राबवते. लेखिका, समीक्षक आणि निरुपणकार प्रा. प्रज्ञा पंडित आणि डिजिटल गुरु मनिष पंडित तेजस्वी फाउंडेशनचे संस्थापक आणि



संचालक आहेत. या संस्थेतर्फे दरवर्षी राज्यातील विविध क्षेत्रात समाजोपयोगी कार्य करणाऱ्या प्रेरणादायी गुणवंतांचा सन्मान करण्यात येतो. यंदाचा "जीवन गौरव" पुरस्कार जितेंद्र गिरासे यांना प्रदान करण्यात आला. "तेजस्वी उद्योजक" पुरस्काराने मनाली खरे, स्मिता घांगुर्डे आणि संजय रानडे यांना गौरविण्यात आले. साहित्य क्षेत्रातील योगदानासाठी "तेजस्वी साहित्यिक" पुरस्कार श्री. काळूदास कनोजे यांना देण्यात आला. प्रीती लाला, राजीव प्रधान, बाळकृष्ण जाधव, प्रकाश पालांडे, डॉ. रत्ना लाला जवरास, प्रा. अनुराधा पाटील, वर्षा झांबरे, व्यंकट पाटील आणि राजेंद्र गोसावी यांना समाजासाठी भरीव योगदान दिल्याबद्दल "तेजस्वी समाज भूषण" पुरस्काराने गौरवण्यात आले. तसेच, शिक्षण क्षेत्रातील उत्कृष्ट कार्यासाठी "आदर्श शिक्षिका" पुरस्कार राजश्री जाधव यांना प्रदान करण्यात आला. रेनमॅक इंडियाचे प्रायव्हेट लिमिटेड समूहाचे संचालक प्रसिद्ध उद्योगपती निलेश दीक्षित आणि अर्थतज्ज्ञ सीए निखिलेश सोमण यांच्या हस्ते हे पुरस्कार प्रदान करण्यात आले. या सोहळ्यास अनेक मान्यवर उपस्थित होते. तेजस्वी फाउंडेशनच्या या उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# लेखक प्रभू अग्रहारकर यांच्या पुस्तकाचे प्रकाशन सोहळा थाटात संपन्न !!

नुकताच दादर येथे शारदाश्रम सभागृहात कोकणदीप प्रकाशन आणि शोध आनंदाचा फाऊंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित लेखक प्रभू अग्रहारकर यांच्या कृपा दृष्टी पुस्तकाचे प्रकाशन सोहळा आणि कवी संमेलन निमित्ताने जेष्ठ साहित्यिक व कवी शशिकांत सावंत यांनी सुत्रसंचलन करताना, प्रमुख पाहुणे श्री निलेश उजाळ- गीतकार/लेखक, सौ. नेहा वैभव भगत- समाज सेविका, श्री विलास खानोलकर- कवी/ साहित्यिक, श्री अशोक नार्वेकर उर्फ भाई नार्वेकर- कवी/ गायक, श्री नारायण वसंतराव चितारी- चितारली ट्रॅव्हल्स, पांडुरंग जाधव- कार्यकारी



संपादक/कवी, दिलीप वामन शेडगे- संपादक आणि जेष्ठ कवयित्री डॉ उषाराणी गुजराथी यांना आमंत्रित करून, यांच्या हस्ते चतुर्थ दत्तावतार श्री सद्गुरू माणिक प्रभू महाराज पुष्पहार व श्रीफळ अर्पण करून पुजन करण्यात आले. कार्यक्रमाच्या सुरुवातीला गायक व संगीतकार एकनाथ धयाळकर यांनी आपल्या मधूर आवाजात 'स्वागत गीत' सादर केले. त्या नंतर, मान्यवरांचे शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आले. तसेच उमाकांत सावंत , उदय अग्रहारकर, मोहन जाधव, नितीन सुगदरे, विलास देवळेकर आणि दत्ता खंदारे यांचा विशेष सत्कार करण्यात आले. त्या नंतर मनोगत व्यक्त करताना, विलास खानोलकर यांनी लेखक प्रभू अग्रहारकर, भाई नार्वेकर, शशिकांत सावंत, दिलीप शेडगे आणि नेहा भगत यांना शाल घालून व पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. आणि कृपा दृष्टी पुस्तकाचे प्रकाशन झाले, असे जाहीर केले. तसेच नेहा भगत यांनीही कृपा दृष्टी पुस्तकास शुभेच्छा दिल्या. आणि ह्या पुढील उत्कृष्ट सुत्रसंचलन पांडुरंग जाधव यांनी केले.कविसंमेलनाला सुरुवात झाली. प्रत्येक कवी व कवयित्रींनी वेगवेगळ्या प्रकारच्या कविता सादर करुन, उपस्थितांची मने जिंकली. तसेच सहभागी कवींना सन्मानपत्र व गुलाब पुष्प देऊन सत्कार करण्यात आले. मध्य वेळेत अल्पोपहार वाटण्यात आले. आणि ह्या कार्यक्रमास महिला आणि पुरुष यांच्या उपस्थितीने चांगलाच प्रतिसाद मिळाला. आणि शेवटी, लेखक प्रभू अग्रहारकर यांनी सहकार्य करणाऱ्यांची नावे घेऊन, यशस्वी कार्यक्रमाबद्दल उपस्थित सर्वांचे मनःपूर्वक आभार व्यक्त केले.

# निसर्ग, भवतालासह विज्ञान रंजनाची झालर असलेल्या कथा

## सूर्यकांत सराफ, जेष्ठ बाल साहित्यिक

'झिब्राच्या कथा' ही तुमची लेखनकृती तिच्या आगळ्या शैलीमुळे अगदी कालसापेक्ष अशी उतरली आहे. विज्ञान रंजनाची झालर असलेल्या या कथा भवतालाची, निसर्गाची उत्तम ओळख वाचकांना करून देण्यात यशस्वी ठरल्या आहेत. कथा नायिकेच्या -झिब्राच्या मनात विविध प्रश्न उभे राहतात, ती त्यांचा पाठपुरावा करते. त्या क्षेत्रातली कुणी अधिकारी व्यक्ती तिचे शंका समाधान करते, असा या कथांचा एकूण शिरस्ता. आपापल्या जागी अगदी अगदी परिपूर्ण योग्य वाटणारी स्वतंत्र व्यक्तिमत्व बाळगणारी पात्रे, त्यांचे चपखल असे संवाद, त्या संवादातून, प्रसंगातून वाढणारी उत्कंठा असे जे रसायन लेखकाने निर्मिले आहे त्याला तोड नाही.बालसाहित्याच्या निर्मितीचा उद्देश बालरंजना पुरता मर्यादित कधीच असू नये. बाल वाचकांच्या अंत:प्रेरणा जागे करण्याचे महत्वाचे कार्य मौलिक साहित्य अगदी सहजगत्या, नकळत करत असते. हे पुस्तक वाचून झालेले बालवाचक भोवतीच्या जगाकडे एका वेगळ्या, सजग नजरेने बघायला शिकलेले असतील अशी खात्री वाटते. झिब्रा प्रमाणेच त्यांच्या मनातही सृष्टीच्या रचनेबद्दल विविध प्रश्न उभे राहायला लागतील आणि त्या उत्तरामधून भविष्यात काही चमत्कार घडायला लागतील. फास्टर फेणे ज्यांचा आवडता नायक होता अशक्ष पिढी आजही आपल्यात आहे. सवंगडी वाटावा असा हा किशोरवयीन मुलगा अफाड धाडस करतो, चाणाक्षपणे आव्हानात्मक समस्या सोडवतो या सुप्त कौतुका सोबतच आपणही असे काहीतरी करावे ही प्रेरणा वाचकांच्या मनी जागी असे. त्यामुळेच त्या नायकाचे शब्द, कृती व्यवहारात अनुकरण करण्या इतके लोकप्रिय झाले होते. झिब्रा या नायिकेच्या कृतीत मला वर्तमान काळातला फास्टर फेणे अवतरलेला जाणवतो. एखाद्या समस्येच्या मुळाशी पोहचण्याची प्रेरणा या कथातून बालवाचकांना नक्कीच मिळेल. दैनंदिन जीवनात सहज समोर येणाऱ्या अनेक निसर्ग नवलाचे वैज्ञानिक विश्लेषण या कथांमधून संजय ऐलवाड यांनी समर्थपणे केलेले आहे. लाजाळूचे झाड, टेकराज, मधमाशी यांच्यातली वैज्ञानिक सत्ये मुलांच्या जगात आपलीशी होताना दिसतात. एकदा झोपमोड झाली की नंतर लवकरच झोप लागत नाही. हा मानवी शरीराचा नियम झाडांना सहजपणे लावून त्यांचे सजीवत्व मानव तुलनेत आणून उभे करण्याचे बळ लेखकाने कथानायिकेला दिलेले आहे. चिमणी दुर्मिळ होण्याने झिब्राच्या मनी उठत असलेली भावनिक व्यथा. त्यासाठी सामुहिक प्रयत्न करावे लागतील. या सामाजिक निष्कर्षापर्यंत पोहोचते हे तिचे यश आहे. रांजणखळगे हा एक परिपूर्ण, उत्कंठावर्धक विज्ञान कादंबरीचा विषय नक्कीच आहे. त्यातील संशोधन, भौगोलिक ज्ञान, त्यातून डोकावणारा भूमीच्या इतिहासाचा मुद्दा, त्याविषयी आस्था बाळगणारे आपल्या देशातील अभ्यासक, त्यांची कार्य पद्धती हे सगळे मुद्दे एका दीर्घ कादंबरीकडे अंगुलीनिर्देश करतात. आणि म्हणूनच किशोर साहित्यात हे पुस्तक आपली स्वतंत्र अशी ओळख निर्माण करील यात शंका नाही. त्यासाठी लेखक संजय ऐलवाड यांना आमच्या मन:पूर्वक शुभेच्छा...

**झिब्राच्या कथा**
**लेखक : संजय ऐलवाड**
**प्रकाशक : संस्कृती प्रकाशन, पुणे.**
**पाने : 60**
**किंमत : 200 रुपये**

# अनु उवाच...४७

## माणूस बदलतो...!!




बहुतेकदा आपण म्हणतो की चांगले अनुभव प्रोत्साहन देतात आणि वाईट अनूभव काहीतरी शिकवून जातात .पण आयुष्यात कोण अपेक्षितरित्या येणं आणि अनपेक्षितरित्या जाणं हा मुद्दा वेगळाच मानू . कधी उलट घडतं एखाद्या वेळी आपलीच माणसं आपल्यामागे खंजीर खूपसतात .आपलीच माणसं अहंकारी होऊन दूर होतात ,आपलीच माणसं गैरसमजांनी लांबतात, आपलीच माणसं दुसऱ्यांनी केलेल्या डोकेसफाईने बदलतात .हे सर्व असताना कधी कधी आपण या वाक्याचा सुरूवातीच्या शब्दाचा विसर पडतो तो म्हणजे आपली माणसं किंवा *आपला माणूस आपण स्वतःचे निर्णय न घेता दुसऱ्याच्या बोलण्यावरून अंतिम निर्णय घेतो तोच नियम भविष्यात भारी पडतो .तेथे मात्र वेळ ही निघून गेलेली असते . त्यांच्या गरजा भागतील,आपल्या गरजांचं काय? एक सोप सूत्र आहे ते म्हणजे कोणाकडून ही कोणतीच अपेक्षा करू नये असे म्हणतात .खूप लाजिरविणी गोष्ट आहे पण शेवटी वास्तविक आहेच .अनपेक्षितरित्या काहीही घडू शकतं . आपण दिलेले महत्त्व,दिलेली वेळेची किंमत जेव्हा अचानक कमी करतो तेव्हा "माणूस बदलला" असे ऐकायला मिळते .ते खरं तर "माणसाला बदलण्यास भाग पाडला" असे असते .आपल्यासोबत दुसऱ्यांवर हसणारी लोकं उद्या दुसऱ्यांबरोबर आपल्यावर हसता कामा नये .म्हणून स्वाभिमान फक्त नावाला,दिखावा म्हणून नको तो जर खरोखर वेळेला किंमत देऊन बाळगला तर सर्व अपेक्षितच घडतं . प्रत्येकाचे भोग असतात .म्हणूनच जीवनात योग्य व ,खास करून,स्वतःचा निर्णय घेतल्यास योग्यच फळ पदरी पडते.

**हिरकणी सौ.अनिता गुजर**
**डोंबिवली**

# प्राध्यापक सोपान सुरवसे यांना राष्ट्रीय पुरस्कार प्रदान

बीड । प्रतिनिधी ज्ञानज्योती बहुउद्देशीय संस्थेच्या वतीने दिला जाणारा मराठी भाषा संशोधन व संवर्धन अध्यापन कार्य गौरव राष्ट्रीय पुरस्कार २०२५ सन्मानपूर्वक डॉक्टर प्राध्यापक सोपान सुरवसे यांना देण्यात आला या कार्यक्रमास उद्घाटक म्हणून रेखाताई भंडारे संविधान अध्यक्ष प्रा डॉक्टर केशव देशमुख स्वागत अध्यक्ष माननीय पोपटराव पठारे व प्रमुख पाहुणे म्हणून आमदार हेमंत भोसले यांच्या उपस्तित देण्यात आला. यावेळी त्यांचे अभिनंदनभारतीय शिक्षण प्रसारक संस्थेचे अध्यक्ष मा. डॉ सुरेंद्र अलुरकर, मा. डॉ हेमंत वैद्य, कार्यवाह भारतीय शिक्षण प्रसारक संस्था, स्वातंत्र्यवीर सावरकर शैक्षणिक संकुल अध्यक्ष.मा. डॉ पुरुषोत्तम कुलकर्णी, स्थानिक कार्यवाह डॉ अविनाश देशपांड`, महाविद्यालय विकास समिती अध्यक्ष.मा.प्रा.चंद्रकांत मुळे, महाविद्यालयाचे प्राचार्य प्रोफेसर डॉ सुहास मोराळे, उपप्राचार्य प्रोफेसर डॉ लक्ष्मीकांत बाहेगव्हाणकर, उपप्राचार्य प्रोफेसर डॉ उत्तम साळवे यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या

# बीडच्या पाणीप्रश्नी मुख्याधिकारी अंधारे कडून यंत्रणेची झाडाझडती

शहरातील पाणीप्रश्नी नेहमीच होणारी ओरड आणि रमजान ईदला शहरात पाणी टंचाईचा प्रश्न निर्माण होऊ नये म्हणून बीड नगरपरिषदेच्या मुख्याधिकारी निता अंधारे यांनी रणरणत्या उन्हात स्वतः काडी वडगाव आणि ईट येथील पाणीपुरवठा फिल्टरच्या ठिकाणी भेट देऊन पाहणी केली. यंत्रणेची झाडाझडती घेत आवश्यक सूचना केल्या आहेत. यामुळे त्यांचे आभार मानले जात आहे. शहराला माजलगाव बॅकवॉटर आणि बिंदुसरा प्रकल्पातून असे दोन्ही ठिकाणांहून पाणीपुरवठा होतो. तरीही शहरात पाणी पुरत नसून नेहमीच पाणी टंचाई



निर्माण होत असल्याची ओरड होत आहे. तसेच पाच दिवसांवर रमजान ईद आल्याने ऐन सणासुदीच्या काळात हा प्रश्न आणखी उग्र रूप धारण करु नये म्हणून याची दखल घेत नेमकी अडचण आणि पाणी गळतीचे प्रमाण किती याची पहाणी करण्यासाठी मुख्याधिकारी निता अंधारे यांनी काडी वडगाव, ईट या दोन्ही ठिकाणच्या फिल्टरची पाहाणी केली. पाणी येण्याचे प्रमाण पाहून, पूर्ण पाइपलाइनची पहाणी केली आहे. याबाबत कर्मचाऱ्यांना कडक सूचना केल्या आहेत. यावेळी त्यांच्यासोबत पाणीपुरवठा विभागाचे अभियंता व इतर अधिकारी उपस्थित होते.

# मानवी जीवनातील कला म्हणजे परिसच -माधव राजगुरु

मानवी जीवनात जोपासले जाणारे छंद व अंगभूत असलेल्या कला ह्या खऱ्या अर्थाने परिसाप्रमाणे असतात. त्यांचा उपयोग करून आपण अर्थपूर्ण जीवन जगू शकतो असे मत अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्था पुणे चे अध्यक्ष माधव राजगुरू यांनी व्यक्त केले.

संस्थेच्या शिरूर शाखेच्या उद्घाटनानिमित्त रांजणगाव येथील कार्यक्रमामध्ये ते बोलत होते.

बालकुमार संस्थेच्या शिरूर शाखेच्या वतीने मराठी भाषा गौरव दिनाच्या निमित्ताने तालुकास्तरीय सुंदर हस्ताक्षर स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. तालुक्यातील ७६ शाळांनी या स्पर्धेमध्ये सहभाग घेतला होता. या स्पर्धेच्या बक्षीस वितरणाचे आयोजन



याप्रसंगी करण्यात आले होते.

बालकुमार साहित्य संस्थेचे हे सुवर्ण महोत्सवी वर्ष आहे यानिमित्ताने संस्थेच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात येत आहे, त्या पार्श्वभूमीवर शिरूर शाखेच्या वतीने ही स्पर्धा घेण्यात आली,अशी माहिती शिरूर शाखाध्यक्ष राहुल चातुर यांनी यावेळी दिली.

या कार्यक्रमासाठी बालकुमार साहित्य संस्था, पुणे चे कार्याध्यक्ष अनिल कुलकर्णी, ज्येष्ठ समाज प्रबोधनकार उत्तम अण्णा भोंडवे, शिक्षक संघटनेचे राज्य अध्यक्ष अनिल पलांडे, महाराष्ट्र साहित्य परिषद शिरूरचे अध्यक्ष मनोहर परदेशी, केंद्रस्तरीय सदस्य सचिन बेंडभर, पदवीधर शिक्षक संघटनेचे तालुकाध्यक्ष कल्याण कोकाटे, केंद्रप्रमुख यशवंत रणदिवे, संचालक रामचंद्र नवले इ. मान्यवर उपस्थित होते. यावेळी स्वरा भुजबळ, आराध्या गावडे, नियती कटारिया, अधिरा शेळके, शौर्य कळसकर, आरुष चव्हाण, आरुष लोखंडे, तेजस्विनी चिकटे, तेजस्विनी शिंदे, स्वरा पवार, सान्वी अडसूळ, शौर्यप्रताप कळसकर, सर्वज्ञ वाळके, अनिष्का पऱ्हाड, स्वरांजली भागवत, रूची निषाद , अन्वी गायकवाड, सृष्टी बोऱ्हाडे, श्रेयश शिंदे, अस्मिता नळकांडे, ईश्वरी उबाळे, सह्याद्री वीर, अदिती गायकवाड ,अंबिका पवार, स्वानंद दंडवते, शर्वरी गुंड, प्रगती वानखेडे, देवांशी झांजे इत्यादी विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यात आला.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये गडकोट किल्ले संवर्धन व पर्यावरण जतन याबाबत विशेष मोहीम राबवल्याबद्दल शिवदुर्ग प्रेमी प्रतिष्ठानचे संस्थापक उमेश धुमाळ व विद्यार्थ्यांमध्ये स्वसंरक्षण निर्माण करण्यासाठी लाठीकाठी व योग प्रशिक्षणाचे आयोजन करण्याबद्दल किरण अरगडे यांचा मान्यवरांच्या हस्ते विशेष सन्मान करण्यात आला.

या कार्यक्रमासाठी म.सा.प. शिरूर चे कार्याध्यक्ष कुंडलिक कदम , बालकुमार संस्थेचे कार्याध्यक्ष संजीव मांढरे ,कार्यवाह विवेकानंद फंड ,उपाध्यक्ष गुरुनाथ पाटील ,कोषाध्यक्ष संभाजी चौधरी, कार्यकारणी सदस्य शेखर फराटे, आकाश भोरडे,विठ्ठल वळसे तानाजी धरणे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते. कवी मनोहर परदेशी व बालकवी अनिष्का पऱ्हाड यांनी सादर केलेल्या कवितांनी उपस्थितांची मने जिंकली

युवा उद्योजक कवी मयूर करंजे यांनी या कार्यक्रमासाठी विशेष सहकार्य केले.

# वडवणी तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडत होणार

वडवणी । प्रतिनिधी वडवणी तालुक्यातील सन २०२५ ते २०३० कालावधीत गठीत होणाऱ्या ३५ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडत हि २५ मार्च रोजी तहसील कार्यालय सभागृहात होणार आहे तरी या सोडत कार्यक्रमास तालुक्यातील सर्व नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार वैभव महेंद्रकर यांनी दिलेल्या प्रसिध्दी पत्रकाद्वारे केले आहे. वडवणी तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतीच्या सरपंचपदाच्या आरक्षण सोडत मा. जिल्हाधिकारी बीड यांचे अधिसुचना जा.क्र.२०२५/ जिबी/डस्क-२/२०२५ २०३८ ग्रा.पं. सरपंच आरक्षण /कावी-६४३ दि. १७/०३/२०२५ अन्वये ग्रामविकास विभाग महाराष्ट्र शासन यांचेकडील राजपत्र असाधारण भाग चार व दि. १०/०३/२०२५ अन्वये दिलेल्या निर्देशाप्रमाणे मुंबई ग्रामपंचायत (सरपंच व उपसरपंच) नियम १९६४ मधील नियम ३ अ प्रमाणे तालुक्यातील सरपंचाची पदे वेगवेगळया प्रवर्गासाठी तसेच समांतर प्रवर्गासाठी आगामी पाच वर्षाकरिता (सन २०२५ ते २०३० या कालावधीसाठी) गठीत होणा या ग्रामपंचायतीकरिता सरपंच पदासाठी सोडत पध्दतीने आरक्षण दिनांक २५ मार्च २०२५ सकाळी ११.०० वाजता तहसिल कार्यालय वडवणी येथील सभागृहात आयोजित करण्यात आले आहे. तरी सर्व नागरिकांनी वडवणी तालुक्यातील ३५ ग्रामपंचायतीच्या सरपंच पदाच्या आरक्षण सोडतीच्या कार्यक्रमास तहसिल कार्यालय वडवणी येथील सभागृहात दि. २५ मार्च २०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन तहसीलदार वैभव महिंद्रकर यांनी केले आहे.

# लोकमाता अहिल्याबाई यांचा त्रिशताब्दी जयंती महोत्सव व महिलादिन संपन्न जेष्ठ कवी बाळासाहेब तोरस्कर सन्मानित

पुणे : राष्ट्रीय शिक्षक संचेतना, चॉईस महाविद्यालय पुणे व हिंदी प्रचार प्रसार विश्व संघटन यांच्या संयुक्त विद्यमाने लोकमाता अहिल्याबाई यांची ३०० वी जयंती आणि आंतरराष्ट्रीय महिला दिन पुणे येथील चॉईस महाविद्यालय येथे उत्साहात साजरा करण्यात आला. ह्या कार्यक्रमांतर्गत राष्ट्रीय परिसंवाद, बहुभाषिक कविसंमेलन, राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आणि लोकमाता अहिल्याबाई सन्मान समारंभ संपन्न झाला. राष्ट्रीय शिक्षक संचेतनाचे राष्ट्रीय कोषाध्यक्ष डॉ. प्रभु चौधरी आणि प्राचार्य अफताब अनवर



शेख यांच्या मार्गदर्शनाखाली या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात शिक्षण , साहित्य, समाजसेवा आदी क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या स्त्रियांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानचिन्ह व सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. या कार्यक्रमात प्रदेशाध्यक्ष जेष्ठ कवी डॉ. बाळासाहेब तोरस्कर ठाणे यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र , शाल देऊन डॉ.प्रभु चौधरी, चवाकुल रामकृष्ण राव , सुवर्णा जाधव, डॉ. निर्मलासिंह राजपूत आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले . या कार्यक्रमाला चवाकुल रामकृष्ण राव अध्यक्ष हिंदी प्रेमी मंडल हैदराबाद, साहित्यिका डॉ. भावना गुप्ता पुणे, डॉ. प्रभु चौधरी राष्ट्रीय कोषाध्यक्ष उज्जैन , साहित्यिक सुधीर मिश्र पुणे, प्राचार्य डॉ अफताब अनवर शेख चॉईस महाविद्यालय पुणे उपस्थित होते.

# महाराष्ट्रातील दोन महिला डॉक्टरांचा मध्यप्रदेशात भीषण अपघातात मृत्यू

शिवपुरी । प्रतिनिधी मध्य प्रदेशच्या शिवपुरी जिल्ह्यात फोरलेन हायवेवर भीषण अपघात झाला. यामध्ये अर्टिगा कार उलटून कारमधील दोन महिला डॉक्टरांचा मृत्यू झाला आहे. तर अन्य चार डॉक्टर जखमी झाले आहेत. हे सर्व डॉक्टर एकाच कारमधून तीर्थयात्रेसाठी निघाले होते. अयोध्येला जाऊन आल्यानंतर ते उज्जैन महाकालेश्वर मंदिराकडे जात होते. यावेळी लुकवासा पोलिस ठाणे क्षेत्रात शिवपुरी–गुना हायवेवर त्यांची कार अनियंत्रित झाली, यामुळे ती उलटून पुलावरून खाली कोसळली. दहा दिवसांपूर्वी हे सर्व डॉक्टर तिर्थयात्रेसाठी गेले होते. डॉ. अतुल आचार्य हे कार चालवत होते. कवासा बायपासवर त्यांचे कारवरील नियंत्रण सुटले. अपघाताची माहिती मिळताच कोलारस पोलिस ठाण्याची मदत आली आणि जखमींना हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले. डॉ. अतुल आचार्य हे भिवंडीचे असल्याचे सांगितले जात आहेत. सकाळी आठ वाजता हा अपघात झाला आहे. जखमींमध्ये डॉ. उदय जोशी (६४) रा. दादर, डॉ. सुबोध पंडित (६२) रा. वसई, डॉ. अतुल आचार्य (५५) रा. भिवंडी आणि डॉ. सीमा जोशी (५९) यांचा समावेश आहे. तर मृतांमध्ये अतुल आचार्य यांची पत्नी डॉ. तन्वी आचार्य (५०) व सुबोध पंडित यांची पत्नी डॉ. नीलम पंडित (५५) यांचा मृत्यू झाला आहे. नीलम यांना हॉस्पिटलमध्ये नेत असताना मृत्यू झाला तर तन्वी यांचा जागेवरच मृत्यू झाला होता

# कर्ज आहे म्हणून पोटगी नाकारता येणार नाही : न्यायालयाचा निष्कर्ष

। प्रतिनिधी पुणे । प्रतिनिधी कर्ज आहे म्हणून पोटगी नाकारता येणार नाही. पतीची पत असल्यानेच कर्ज मिळाले आहे, असा निष्कर्ष काढत न्यायालयाने पत्नीला ९ हजार रुपये व दोन्ही मुलांना प्रत्येकी ७ हजार रुपये दरमहा अंतरिम पोटगी देण्याचा आदेश दिला. याबरोबरच मुलांचा शिक्षणाचा खर्च आणि तसेच मुलांना भेटण्यासाठी जाण्या-येण्याचा खर्चही द्यावा, असेही कौटुंबिक न्यायालयाचे न्यायाधीश के.व्ही. ठाकुर यांनी अदेशात म्हटले आहे. पतीने न्यायालयात ३० लाख रुपये कर्ज असल्याचे सांगितले होते. या पार्श्वभूमीवर हा निष्कर्ष काढला आहे. विशेष म्हणजे पिंपरी न्यायालयाने कौटु ंबिक हिंसाचाराच्या दाव्यात दरमहा १० हजार रुपये पोटगी देण्याचा आदेश दिला आहे. त्यामुळे न्यायालयाच्या वेगवेगळ्या आदेशानुसार पतीला दोन पोटगी द्यावी लागणार आहे. वैभव आणि वैभवी (नावे बदलली आहेत) अशी दोघांची नावे आहेत. जून २०१५ मध्ये दोघांचा विवाह झाला. सुरूवातीला काही वर्षे संसार सुरळीत चालू होता. दोन मुलेही झाली. मात्र, त्यानंतर दोघांचे पटेनासे झाले. ३० जून २०१९ पासून दोघे वगळे राहू लागले. १२ नोव्हेंबर २०१९ रोजी पत्नीने घटस्फोटासाठी अर्ज दाखल केला. त्यावेळी करोना काळ होता. पतीचे कपड्याचे दुकान आहे. त्याने ३० लाख रुपयांचे कर्ज असल्याचे आणि वार्षिक उत्पन्न ४ लाख ८६ हजार रुपये असल्याचे प्रतिज्ञापत्र न्यायालयात दाखल केले. ती मात्र कमविती नव्हती. तसेच, करोना काळापेक्षा आता पतीचे उत्पन्न जास्त झाले असल्याचेही पत्नीच्या वकील ॲड. राणी कांबळे-सोनावणे यांनी न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिल



आज दि.२५/०३/२५रोजी कल्याण येथील आधारवाडी कारागृहाला भेट दिली.कारागृहातील कैद्यांना वाचनाची आवड निर्माण व्हावी,त्यांचा कारागृहातील वेळ सत्कारणी लागावा,या दृष्टिकोनातून कारागृहाला वाचनीय पुस्तके भेट देण्यासंदर्भात तेथील वरिष्ठ पोलिस निरीक्षक अभिजीत कोळी साहेब यांना संस्थेच्या माध्यमातून निवेदन देण्यात आले.अभिजित कोळी साहेबांनी माझे मनमोकळेपणाने स्वागत केले व संस्थेची माहिती जाणून घेतली व समाधान व्यक्त केले.कारागृहाला वाचनीय भेट देण्याचा उपक्रम पुढील आठवड्यात समारंभपूर्वक होणार आहे त्यावेळी कारागृह अधिक्षकांना जनजागृती सेवा संस्थेच्यावतीने वाचनीय भेट देण्यात येतील.

# जीवनामृत प्र-बोध प्रातिनिधिक संग्रहाचे प्रकाशन.

साहित्य कस्तुरी प्रस्तुत सौ. विद्याराणी मलवडकर संपादित जीवनामृत प्र-बोध प्रातिनिधिक संग्रहाचे प्रकाशन नुकतेच क्रांतीसुर्य महात्मा ज्योतिबा फुले यांचे जन्मगाव कटगुण येथे वडील कवी, गायक पंडित आलेकरी सर व सौ.आई कुसुम आलेकरी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी बंधू मनोज आलेकरी, मुलगी आर्या मलवडकर, महात्मा जोतिबा फुले आश्रम शाळा विश्वस्त गोरे सर, मुख्याध्यापक आणि शिक्षक स्टाफ तसेच माणिकराव गणपत गायकवाड पोपट गणपत जगताप (PSI) आनंदराव पवार (PSI) उपस्थित होते.

प्रसंगातून बोध ही कवयित्री





लेखिका, साहित्य कस्तुरी व्यवस्थापकीय संचालिका सौ. विद्याराणी मलवडकर यांची स्व-साहित्य निर्मिती आहे. त्यांचे जवळजवळ तीनशे प्र-बोध लेखन पूर्ण झालेले असताना सुद्धा समूहात मार्गदर्शनाद्वारे उत्तम प्र-बोध लिहिणाऱ्या प्र-बोधकारांना घेऊन प्रातिनिधिक संग्रह काढावा असा विचार त्यांच्या मनात आला आणि सर्वांच्या सहकार्याने शॉपिजनोंपवर हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले.

प्रसंगातून बोध म्हणजे आजूबाजूला घडणाऱ्या घटनांमधून वेचक प्रसंग सात वाक्यात उभा करायचा आणि त्यातून सकारात्मक समर्पक बोध मांडायचा ही अभिनव कल्पना सौ. विद्याराणी मलवडकर यांची आहे त्याला सर्व प्र-बोधकारांनी संमती दिल्यानंतर हे पुस्तक अस्तित्वात आले याला गो.नी. दांडेकर यांच्या भाची कवयित्री, अहिल्याभूषण सौ. निलांबरी जी गानू यांची प्रस्तावना लाभली आहे. तसेच जगभरातील साहित्यिकांचे व वाचकांचे हक्काचे व्यासपीठ साहित्य कस्तुरीचे संस्थापक काव्यरत्न रावसाहेब राशिनकर (साहेब )कवी, आर जे जगदीश संसारे सर, कवयित्री डॉ. मायाताई यावलकर, कवी पांडुरंग कुलकर्णी यांच्या शुभेच्छा लाभल्या आहेत.

यामध्ये रामकृष्ण नागरगोजे, वर्षा गंपावार,मीना सुरेश पाटणे,डॉ. सुरेखा तरार,महेंद्र वनगे,शैलजा वनगे,सुजाता मुसळे,जयश्री शिंदे,स्नेहलता काळे,विद्या कुंभार,वृषाली वानखडे, डॉ. प्रकाश पांडे,मृणाल प्रभुणे,प्रतिभा कुलकर्णी,चेतन सकपाळ,तेजश्री बोडके, स्वाती कोरगावकर,नीला बर्वे,विद्याराणी मलवडकर या सर्वांचे मिळून शंभर प्र-बोध आहेत.

कवयित्री सोनाली जी जगताप यांच्या कल्पनेतून अतिशय सुंदर असे मुखपृष्ठ साकारले आहे . कवयित्री प्र-बोधकार नीला जी बर्वे आणि शॉपीजन मराठी विभाग प्रमुख ऋचा जी कर्पे यांची पुस्तक बांधणीत विशेष मदत झाली.

तसेच साहित्य कस्तुरी मार्गदर्शक बाबासाहेब राशिनकर (सर ) राज्य संपर्कप्रमुख महाराष्ट्र पत्रकार संघ यांचे प्रोत्साहन लाभले.

हे पुस्तक शॉपीजन ॅप कडून खरेदी करू शकता. या पुस्तकात एकापेक्षा एक सुंदर प्र-बोध आहेत हे पुस्तक सर्वांना नक्कीच आवडेल याची खात्री आहे,असे सौ. विद्याराणी मलवडकर यांनी सांगितले.

# चतुरागिणी संस्थेतर्फे महिला दिनानिमित्त चतुरास्त्र चतुरा पुरस्कार वितरण आणि आरोग्य जनजागृती सत्र..!

मुंबई (प्रतिनिधी-गुरुनाथ तिरपणकर) मुंबई, २२ मार्च २०२५: महिलांच्या कर्तृत्वाचा गौरव करण्यासाठी आणि त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी चतुरागिणी या प्रतिष्ठित संस्थेतर्फे महिला दिनाचे औचित्य साधून 'चतुरास्त्र चतुरा' पुरस्कार सोहळा आणि आरोग्य जनजागृती सत्राचे आयोजन करण्यात आले. हा खास कार्यक्रम नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमध्ये शनिवार, २२ मार्च रोजी उत्साहपूर्ण वातावरणात पार पडला. कार्यक्रमाचा उद्देश महिलांनी विविध क्षेत्रांत केलेल्या कार्याचा सन्मान करण्याबरोबरच आरोग्याविषयी जनजागृती करणे हा होता. यासाठी चतुरागिणी संस्थेने सामाजिक, शिक्षण, कला, क्रीडा, आरोग्य, उद्योग, साहित्य, अध्यात्म, राजकारण अशा अनेक क्षेत्रांतील महिलांकडून त्यांच्या योगदानाची ओळख करून देणारी व्हिडिओज मागवली होती. या स्पर्धात्मक प्रक्रियेतून निवड झालेल्या महिलांना 'चतुरास्त्र चतुरा' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. संचिता सचिन भंडारी यांचा प्लॅटिनम ग्रुपमधून गौरव: चतुरागिणी संस्थेच्या या उपक्रमात संचिता सचिन भंडारी यांना त्यांच्या उल्लेखनीय कार्यासाठी 'चतुरास्त्र चतुरा' पुरस्कार जाहीर करण्यात आला. विविध क्षेत्रांतील महिलांनी प्रेक्षकांसमोर आपली प्रेरणादायी कामगिरी उलगडली. कर्जत, अलिबाग, पनवेल, दादर आणि बोरिवली येथून आलेल्या अनेक महिलांनी या कार्यक्रमाला हजेरी लावून हा सोहळा संस्मरणीय बनवला.



शिल्पा देसाई आणि कोअर टीमचे मोलाचे योगदान: कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी चतुरागिणी संस्थेच्या शिल्पा देसाई आणि त्यांच्या कोअर टीमने खूप मेहनत घेतली. महिलांच्या सशक्तीकरणासाठी नेहमीच सक्रिय असणाऱ्या शिल्पा देसाई यांच्या नेतृत्वाखाली हा कार्यक्रम उत्तम प्रकारे पार पडला. त्यासोबतच नानावटी मॅक्स सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलमधील डॉक्टर्सनी आरोग्यविषयक सत्रात उपस्थित महिलांना महत्वपूर्ण आरोग्य सल्ले दिले आणि जीवनशैली सुधारण्याचे मार्गदर्शन केले. महिला सशक्तीकरणासाठी पुढील कार्यक्रम आयोजित करण्याची इच्छा: कार्यक्रमाच्या शेवटी शिल्पा देसाई यांनी चतुरागिणी संस्थेच्या महिला सदस्यांचे आभार मानत भविष्यातही महिलांसाठी विविध उपक्रम आयोजित करून त्यांना नवनवीन संधी उपलब्ध करून देण्याची इच्छा व्यक्त केली. महिलांनी अशा कार्यक्रमांमध्ये मोठ्या प्रमाणावर सहभाग घेत आपल्या कर्तृत्वाची छाप उमटवावी, अशी सदिच्छाही त्यांनी व्यक्त केली. चतुरागिणी फेसबुक ग्रुपचा विकास आणि उत्तरोत्तर प्रगती: चतुरागिणी फेसबुक ग्रुपच्या माध्यमातूनही महिलांना प्रोत्साहित करण्याचे कार्य सातत्याने सुरू आहे. या ग्रुपच्या माध्यमातून महिलांना संवाद, मार्गदर्शन, कौशल्यविकास आणि प्रेरणा देणारे अनेक उपक्रम राबवले जात आहेत. या ग्रुपची प्रगती होत राहावी आणि अधिक महिलांनी त्याचा लाभ घ्यावा, अशी अपेक्षा संस्थेच्या वतीने व्यक्त करण्यात आली. कार्यक्रमाची सांगता एका स्नेहभोजनाने झाली आणि सर्वांनी एकमेकांशी संवाद साधत प्रेरणादायी क्षण अनुभवले. महिलांच्या योगदानाचा गौरव करणारा आणि आरोग्यविषयी महत्त्वपूर्ण माहिती देणारा हा कार्यक्रम उपस्थित महिलांसाठी एक संस्मरणीय अनुभव ठरला. चतुरागिणी संस्थेचा हा उपक्रम महिलांच्या सशक्तीकरणासाठी निश्चितच एक दिशादर्शक पाऊल ठरला आहे.

# अखिल भारतीय बालकुमार साहित्य संस्थेतर्फे बालवाङ्:मय पुरस्कारासाठी साहित्य पाठविण्याचे आवाहन

पुणे : सुवर्ण महोत्सवी वर्ष साजरा करत असलेल्या अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्थेच्या वतीने देण्यात येणाऱ्या विविध बालवाङ्:मय पुरस्कारासाठी पुस्तके पाठविण्याचे आवाहन करण्यात येत आहे. सन 2024 या वर्षात प्रकाशित झालेले बालकादंबरिका, बालकथा, किशोरकथा, शिशुकथा, एकांकिका व विज्ञान, चरित्र, काव्य, बालनाट्य, विज्ञान साहित्य, ग्रंथसजावट, प्रकाशक, बालसाहित्य समीक्षा, स्वैर अनुवाद, ललित साहित्य, मुलांचे अप्रकाशित साहित्य, प्रथम प्रकाशन, बालदिवाळी अंक (3 कविता, 3 कथा) या व्यतिरिक्त बालसाहित्यावर विशेष संशोधन करणाऱ्या लेखकास प्रोत्साहनपर अमरेंद्र गाडगीळ पुरस्कार देण्यात येणार आहे. वरील प्रकारचे साहित्य 1 जानेवारी 2024 ते 31 डिसेंबर 2024 या कालावधीत प्रकाशित झालेले असावे. रोख रक्कम आणि सन्मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. लेखक तसेच प्रकाशकांनी पुस्तकांसह लेखकाचा परिचय व छायाचित्र पाठवावे. ग्रंथ 20 एप्रिल 2025 पर्यंत अखिल भारतीय मराठी बालकुमार साहित्य संस्था, 202 बालाजी कॉम्प्लेक्स, बालाजीनगर, धनकवडी, पुणे 411043 या पत्त्यावर पोहोचतील अशा बेताने पाठवावेत, असे आवाहन पुरस्कार समिती सदस्य शिवाजी चाळक, सचिन बेंडभर यांनी केले आहे. अधिक माहितीसाठी 9834400481 या क्रमांकावर संपर्क साधावा.

दैनिक लोकक्रांतीचा आरंभ
लोकआरंभ
संपादक:राहुल मारोतीराव वाईकर
बुधवार २६ मार्च २०२५
https://lokaarambh.com



## १० वर्षीय मुलीचे अपहरण करणाऱ्या तिघांना बेड्या

शिरूर । प्रतिनिधी शिरूर । प्रतिनिधी शिरूर । प्रतिनिधी शिरूर । प्रतिनिधी शिरूरच्या जोशीवाडी येथून १० वर्षीय मुलीचे अपहरण करणार्या तिघांना शिरूर पोलिसांच्या तपास पथकाने अटक केली. अपहरण केलेल्या बालिकेची मुंबई येथून सुटका करून नातेवाइकांच्या ताब्यात दिली असल्याची माहिती शिरूरचे पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी दिली. अटक केलेल्यांमध्ये दोन महिलांचा समावेश असून, लताबाई बसीर काळे, आकाश बसीर काळे आणि सुप्रिया ऊर्फ रॅम्बो आकाश काळे (सर्व रा. सोनेसांगवी, ता. शिरूर) अशी अटक केलेल्यांची नावे आहेत. याबाबत बालिकेच्या कुटुंबीयांनी शिरूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली होती. दि. १३ मार्च रोजी सकाळी ८ ते दुपारी १ च्या दरम्यान शिरूर शहरातील जोशीवाडी येथून १० वर्षीय बालिकेचे अपहरण केल्याची फिर्याद दाखल करण्यात आली होती. याची दखल घेत पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी तपास पथकाला दिशानिर्देश दिले होते. पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण व पोलिस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, रवींद्र आव्हाड यांनी अपहृत बालिका व आरोपींचा शोध घेण्यासाठी शिरूर शहरामधील सुमारे १०० पेक्षा अधिक सीसीटीव्ही फुटेज तपासले. तांत्रिकदृष्ट्या तपास करीत असताना लता, आकाश आणि सुप्रिया या तिघांनी मोटरसायकलवर बालिकेचे अपहरण करून पळवून नेल्याचे सिद्ध झाले. पोलिस पथकाने या तीनही संशयितांना ताब्यात घेतले. त्यांना पोलिसी खाक्या दाखवताच त्यांनी बालिकेचे अपहरण केल्याची कबुली देऊन तिला बेलापूर-मुंबई येथे नातेवाइकांकडे ठेवले असून, ही मुलगी आमची असून, आम्ही उपचारासाठी दवाखान्यामध्ये जात आहोत, परत आल्यावर तिला घेऊन जातो, असे नातेवाइकांना सांगितले होते. याबाबत तत्काळ पोलिस निरीक्षक संदेश केंजळे यांनी पोलिस उपनिरीक्षक शुभम चव्हाण, पोलिस अंमलदार नितेश थोरात, विजय शिंदे, निरज पिसाळ, महिला पोलिस अंमलदार गीता सुळे यांचे पथक तयार करून अपहृत बालिका हिला तत्काळ बेलापूर मुंबई येथे जाऊन ताब्यात घेऊन नातेवाइकांच्या सुपूर्त केले.

# शेतकऱ्याचा मुलगा झाला पोलीस अधिकारी
## राजेश निर्मळ यांनी आई-वडिलांची केले स्वप्न साकार

**पाटोदा प्रतिनिधी :- गोकुळ इंगोले कार्यकारी संपादक**

बीड जिल्ह्यातील पाटोदा तालुक्यांमध्ये एका छोट्याशा पिट्टी गावामध्ये अतिशय गरीब परिस्थितीमध्ये घरची परिस्थिती बिकट असताना त्याने स्वतःच्या जिद्दीवर विश्वास ठेवत आपलं नाव एका सुवर्ण पानावर कोरले आहे. त्याच्या त्या मेहनतीचे फळ त्यांना आज भेटले आहे कारण आज त्यांची पोलीस उपनिरीक्षक पीएसआय पदी निवड झाली आहे या निवडीमुळे सर्वत्र कौतुक होत असून आनंद व्यक्त होत आहे. राजेश ईश्वर निर्मळ हा एका शेतकरी कामगाराचा मुलगा अत्यंत ग्रामीण भागात राहून शिक्षणाचे धडे जिह्ला परिषदेच्या शाळेमध्ये घेतल्यानंतर अनेक संस्थांच्या माध्यमातून त्यांनी आपली वाटचाल अत्यंत प्रतिकूल परिस्थितीनंतरही सुकूर केली. नम्रता हाच जीवन सुधारण्याचा मार्ग असतो ही बांधिलकी त्याने कायम जपली. आई वडील ,मित्र यांचा विश्वास त्यांनी कधीही पडू दिला नाही. बाबळीचे झाड पावलोपावली मिळते, परंतु चंदन शोधावे लागते या युक्ती नुसार त्याने विविध शाळा महाविद्यालयातील शिक्षक बांधवांची वैचारिक कास धरून त्यानुसार दिशा ठेवली. प्राथमिक शिक्षण जिह्ला परिषद शाळा खोमणे वस्ती येथे करून पुढील माध्यमिक शिक्षणासाठी जवाहर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय निरगुडी येथे झाले अध्ययन करताना त्याने प्रत्येक गुरुजनांचा, मित्रांचा, आदर्श व्यक्तीच्या मार्गदर्शनाला अंतिम मानून त्यानुसार कष्ट परिश्रम घेत वाचनाची सवय लावली भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार आणि कार्याला अगदी समोर ठेवून त्याने पायाचे पण नसले तरी चालेल पण हातात पुस्तक असले पाहिजे ही भूमिका तंतोतंत पाळली. प्रत्येक जण खरतर जीवन विद्यार्थी जगत असतो. वैचारिक प्रगल्भता, शांत, संयमी, संवेदनशील, या गुणांची त्याने कायम स्वतःच्या जीवन वाटचालीत पेरणी केली. प्रचंड संघर्षशील प्रवास त्याच्या वाट्याला आला . वडिलांनी काही दिवस ऊस तोडला .ऊस तोडत आसताना नंतर शरीर साथ देत नसल्याने शेतीचा पर्याय निवडला. शेतकऱ्याचा मुलगा असलेल्या राजेश ने सर्वसामान्य शेतकऱ्यांच्या, ऊसतोड मजुरांच्या, समस्या पाहिल्या आणि जगल्या सुद्धा.

आई-वडिलांच्या वेदना ची जाण ठेवत प्रत्यक्ष डोळ्यांनी जाणून त्यांनी "रात्रीचा दिवस आणि ,दिवसाची रात्र" करून जिद्द, आत्मविश्वास, परिश्रम, आणि महान जिद्दीच्या बळावर यशाचे शिखर गाठले.आणि त्यांची एमपीएससीमार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत हॅलो पोलीस उपनिरीक्षक (PSI) म्हणून निवड झाली आहे.



# मराठीचा जागर करताना संस्कृतीची जपणूक करणे आवश्यक- संमेलनाध्यक्षा छाया महाले

मानवी मेंदू सडत असल्याने दुष्कृत्य, दुर्व्यवहार, दुराचार, अन्याय, अत्याचार घडत आहेत. समाजजीवनाची जाण ठेवण्यासाठी मराठी भाषेसोबतच संस्कृतीचे भान ठेवणे गरजेचे आहे, असे प्रतिपादन मराठी साहित्यमेळाच्या साहित्यपिठावरुन अध्यक्षा छायाताई महाले यांनी केले. संस्काराची पेरणी घराघरातून होणे अत्यावश्यक असल्याचे त्यांनी सांगीतले. मराठी साहित्य हे जमिन असून या जमिनीत बरीच खनिज संपत्ती दडलेली आहे. ही संपत्ती बाहेर काढण्यासाठी वर्तमान साहित्यिकांनी प्रयत्न केले पाहिजे, असे सोहळ्याचे उद्घाटक बाळासाहेब धांडे यांनी उद्घाटनीय प्रसंगी अपेक्षा व्यक्त केली. अतिथी म्हणून जीवन गौरव पुरस्कार्थी कलावंत संजय सांबजवार तथा लता खांदवे, विद्या खडसे, प्रल्हाद हरिणखेडे, प्रदिप पवार, महेश सोनेकर, ताराचंद कंठाळे, स्वागताध्यक्ष मनोहर शहारे आणि संयोजिका कल्याणी मादेशवार हे उपस्थित होते. साहित्यपिठावरुन अनेक साहित्यिकांना सन्मानित करण्यात आले. जीवन गौरव साहित्य परिवारात ऑगष्ट महिन्यात विविध विषयावर केले जाणारे स्पर्धात्मक लेखनातून निवड केलेल्या साहित्य लेखन गौरव पुरस्कारात प्रथम प्रतिभा घुले भंडारा, द्वितीय उमेंद्र बिसेन पुणे, तृतीय वर्षा रहांगडाले गोंदिया, चतुर्थ वैशाली लांजेवार चंद्रपूर आणि पाचवा क्रमांक अश्विनी किशोर बारामती यांना मिळाला असून नागोराव सोनकुसरे नागपूर यांना सेवाव्रती पुरस्कार आणि विशेष सेवाव्रती पुरस्काराने संयोजिका कल्याणी मादेशवार यवतमाळ यांना सन्मानित करण्यात आले. साहित्य प्रेमी पुरस्काराचे मानकरी संतोष स्वामी कपाले बुलढाणा, साहित्य स्नेही पुरस्कार किनवटचे सूर्यभान खंदारे, साहित्यगंध पुरस्कार तोष्णाताई मोकडे यवतमाळ यांना प्रदान करण्यात आले. कविता शिरभाते यांचा रसमाधुर्य व कल्याणी मादेशवार यांचा तिच्या कथा ही पुस्तके प्रकाशित झाली. जीवन गौरव साहित्य परिवारात वर्षभर चालणा-या कार्यभागातून सक्रियतेने वाचन-लेखन कार्य करणा-यांना सदर पुरस्कार दिले जातात.



# संगीत साधना मंचची संगीत सभा उत्साहात



अंबाजोगाई । प्रतिनिधी संगीत साधना मंचच्या वतीने मराठवाड्यातील गायिका सध्या पुणे स्थित स्वरेशा पोरे (कुलकर्णी) यांची गायन सभा रविवारी उत्साहात संपन्न झाली. दुसऱ्या प्रहरात संपन्न झालेल्या समय चक्रा नुसार राग ऐकण्याची या सभेत सुरुवातीला स्वरेशा पोरे यांनी सकाळच्या दुसऱ्या प्रहरातील राग नटभैरव विलंबित एकतालातील, समझत नही या बंदिशीने आपल्या गायनाची सुरुवात केली यानंतर नाचत नटराज या द्रुत तीन तालातील बंदीशीने रसिकांची मने वेधून घेतली. यानंतर स्वरेशा पोरे यांनी पंडित सी. आर.व्यास रचित राग बिलासखानी तोडी मधील ङ्ङत्यज रे अभिमान,जान गुनियन सो ही सर्व परिचय बंदिश सादर केली. यानंतर दृत एकतलातील ङ्ङजागत तोरे कारण बलमा अनोखी बंदी सादर केली या बंदीची वैशिष्ट्य म्हणजे, अस्थाई एक तालाच्या वजनाने जात होती आणि अंतरा मात्र तिनतालाच्या वजनाने जाऊन परत एकदा एक तालाच्या वजनाला भिडत होता.

## राज्यभरात जिवंत सातबारा मोहीम; सर्वसामान्यांना होणार हा मोठा फायदा,

मुंबई : राज्यातील सातबाऱ्यांसंदर्भात राज्य सरकारने मोठा निर्णय घेतला आहे. सातबाऱ्यावरील सर्व मृत खातेदारांऐवजी वारसांची नावे नोंदवली जाणार आहेत. यासाठी सर्व जिल्ह्यांमध्ये मजिवंत सातबारा मोहीम म राबवण्याचे आदेश महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे ( ) यांनी दिले आहेत. ही मोहीम राबवण्यासाठी तहसीलदारांची समन्वय अधिकारी व जिल्हाधिकाऱ्यांची नियंत्रण अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. १० मे पर्यंत राज्यातील सर्व सातबारे अद्यायावत करण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले असल्याची माहिती देण्यात आलीय . महाराष्ट्र सरकारने १९ मार्च रोजी राज्यभरात मजिवंत सातबारा मोहीमम राबविण्याचा एक अध्यादेश जारी केला. बुलढाणा जिल्ह्यातील चिखलीचे तहसीलदार संतोष काकडे यांनी चिखली तालुक्यात यासंदर्भात एक मोहीम राबवली होती. चिखली तालुक्यातील १५९ गावांमध्ये ही योजना यशस्वीपणे राबविण्यात आली होती. शेत जमिनीच्या मूळ मालकाच्या मृत्यूनंतर वारसा आणि ती मालमत्ता वारसदारांच्या नावे करण्याची प्रक्रिया अनेकदा लांबते. ही प्रक्रिया काहीशी वेळखाऊ सुद्धा आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवण्यात अनेक अडथळे येतात.

# बीड तालुक्यातील ग्रामपंचायतींमध्ये महिला राज

बीड। प्रतिनिधी महाराष्ट्र ग्रामपंचायत ( सरपंच व उपसरपंच) निवडणूक नियम १९६४ मधील नियम - ३ - ( अ ) , ब तसेच ४ प्रमाणे तालुका निहाय बीड जिल्हयातील १०३४ ग्रामपंचायती वेगवेळया प्रवर्गासाठी व महिलासाठीच्या सरपंच पदाचे आरक्षण मंगळवारी ( २५ मार्च ) निश्चित करण्यात आले आहे . त्यानुसार १०३४ पैकी अनुसूचित जातींच्या माहिलासाठी ७३ , अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी आठ , नागरिकांचा मागास प्रवर्ग ( एसबीसी ) १४२ तर खुल्या प्रवर्गातील ३०३ महिलांना सरपंच पदाचे आरक्षण मिळणार आहे . अशी अधिसूचना जिल्हाधिकारी अविनाश पाठक यांनी जारी केली . हे आरक्षण निश्चित करताना त्या त्या तालुक्यातील अनुसूचित जाती , जमाती , नागरिकांचा मागासप्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्गाच्या व्यक्तींसाठी त्या त्या जाती , जमाती व मागास प्रवर्गीय महिलांसाठी ग्रामपंचायतींची लोकसंख्या २०११ च्या जनगणनेनुसार निश्चित केली आहे. तालुक्यातील ग्रामपंचायतींमधील सरपंच पदे अनुसूचित जाती , अनुसूचित जमाती , नागरिकांचा मागास प्रवर्ग आणि सर्वसाधारण प्रवर्ग यासाठी राखीव ठेवताना महाराष्ट्र ग्रामपंचायत ( सरपंच व उपसरपंच ) निवडणूक नियम १९६४ मधील नियम ५ व ६ मध्ये नमुद तरतुदी तसेच ग्रामविकास विभागाने वेळोवेळी निर्गमीत केलेले शासन निर्णय , आदेश आणि परिपत्रकानुसार सरपंच पदाच्या आरक्षणाची कार्यवाही नियमानुसार पूर्ण करावी ,असे आदेशही जिल्हाधिकारी यांना जिल्हयातील सर्व तहसीलदारांना दिले होते . याबाबत सामान्य प्रशासन विभागाचे उपजिल्हाधिकारी शैलेंद्र सूर्यवंशी , निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी , तहसीलदार अविनाश शिंगटे यांनी सविस्तर प्रशिक्षण घेतले होते . बीड तालुक्यातील एकूण १७५ सरपंच पदांपैकी अनुसूचित जातीतील सर्वसाधारणसाठी १० आणि महिलांसाठी ११ , अनुसूचित जमातीच्या महिलांसाठी एक , नागरिकांच्या मागास प्रवर्गातील सर्वसाधारणसाठी २३ तर महिलांसाठी २४ , खुल्या प्रवर्गातील सर्वसाधारणसाठी ५२ आणि महिलांसाठी ५३ असे सरपंच पदाचे आरक्षण असेल . बीड तहसील कार्यालयात वरील प्रमाणे महिला आरक्षण काढण्याची प्रक्रिया मंगळवारी दुपारी अकरा वाजता सुरू झाली . यावेळी उपविभागीय अधिकारी कविता जाधव , तहसीलदार चंद्रकांत शेळके , नायब तहसीलदार सुहास हजारे , नायब तहसीलदार प्रशांत जाधव , अव्वल कारकून महादेव चौरे , वामन तोगरगे , संतोष मुळीक , महसूल सहाय्यक सुधाकर नागरगोजे , अमोल डोंगरे , ग्राम महसूल अधिकारी कृष्णा रत्नपारखे , दादासाहेब शेळके व कार्यालयीन अधिकारी कर्मचारी उपस्थित होते . सर्वप्रथम तालुक्यातील उपस्थित सर्व नागरिकांना तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी कशा पद्धतीने आरक्षण सोडत काढण्यात येईल , याबद्दल सविस्तर मार्गदर्शन केले . शिवाय कोणाला काही अडचण असल्यास त्यांनी ती अडचण मांडावी जेणेकरून त्यांचे समाधान होईल , असे सांगितले . यावेळी लहान मुलगा श्रेयस गायकवाड याच्या हस्ते चिठ्ठ्या काढण्यात आल्या . ह्या प्रक्रियेची संपूर्णतः व्हिडिओग्राफी करण्यात आली . उपस्थित नागरिकांनीही सदरची प्रक्रिया अगदी सुटसुटीतपणे आणि कायदेशीरपणे झाल्याबद्दल समाधान व्यक्त केले .

# वाघ्या कुत्र्याचे इतिहासात पुरावे, शिल्प हटवू देणार नाही; लक्ष्मण हाके यांचा इशारा





ऐतिहासिक संदर्भ नसलेल्या, पुरावे नसलेल्या वाघ्या कुत्र्याची समाधी रायगड किल्ल्यावरुन हटवण्यात यावी, अशी मागणी माजी खासदार आणि रायगड विकास प्राधिकारणाचे अध्यक्ष संभाजीराजे छत्रपती यांनी केली आहे. याबद्दलचे पत्र संभाजीराजेंनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना दिलं आहे. आता या मागणीला धनगर समाजाचे नेते लक्ष्मण हाके यांनी विरोध केला आहे. लक्ष्मण हाके यांनी नुकतंच पुण्यात पत्रकार परिषद घेतली. या पत्रकार परिषदेत लक्ष्मण हाके यांनी कोर्टात जाऊ पण रायगडवरील वाघ्या कुत्र्याच शिल्प हटवून देणार नाही, असा इशारा दिला आहे. संभाजी ब्रिगेड, संभाजी भोसले यांनी महाराष्ट्रात जो काही उपद्व्याप चालू केला आहे, त्याला धनगर समाजाचा पूर्णपणे विरोध आहे, असे लक्ष्मण हाके म्हणाले. संभाजी भोसलेंनी ३१ तारखेचा अल्टिमेटम का दिला?

## धनगर समाजाचा पूर्णपणे विरोध

विशालगडाप्रमाणेच वाघ्याच्या समाधीकडे लक्ष वेधून महाराष्ट्रातील वातावरण कलुषित करण्याचा प्लॅन संभाजीराजे भोसलेंचा आहे. २०१२ ला संभाजी ब्रिगेडने हा वाघ्याचा पुतळा जरी फेकलेला होता, तरी तत्कालीन गृहमंत्री आर. आर. पाटील यांनी तो पुतळा आहे त्या ठिकाणी बसवलेला होता. परत एकदा संभाजी ब्रिगेड, संभाजी भोसले यांनी महाराष्ट्रात जो काही उपद्व्याप चालू केला आहे, त्याला धनगर समाजाचा पूर्णपणे विरोध आहे, असे लक्ष्मण हाके म्हणाले.

संभाजी भोसलेंना विकास आणि प्राधिकरणाचे अध्यक्ष बनवलं आहे. त्यांनी रायगड किल्ल्याचे सरंक्षण करण्याऐवजी नासधूस करण्याची भूमिका गेल्या अनेक दिवसांपासून घेतलेली आहे. संभाजी महाराजांनी ३१ मे ही तारीख का निवडली. ३१ मे रोजी अहिल्याबाई होळकर यांची त्रिशतकोत्तर म्हणजे ३०० वी जयंती महाराष्ट्र साजरा करत आहे. अहिल्याबाई होळकर यांच्या गावी पंतप्रधान मोदींना आणण्याचा आमचा प्रयत्न आहे. तो खूप मोठा कार्यक्रम आहे. त्याआधी संभाजी भोसलेंनी ३१ तारखेचा अल्टिमेटम का दिला? असा सवाल लक्ष्मण हाकेंनी उपस्थित केला. रायगडवरील वाघ्या कुत्र्याच शिल्प हटवून देणार नाही "रायगड विकास प्राधिकरणावरुन संभाजीराजे भोसले यांची हकालपट्टी व्हावी. कारण त्यांनी विशालगडाची नासधूस केली आहे. आता वाघ्या कुत्र्याचे नासधूस करण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. जर ३१ मेच्या आधी जर असं काही घडलं तर तमाम महाराष्ट्रातील धनगर समाजाला त्याला विरोध असेल. आम्ही मुख्यमंत्र्याला पत्र लिहू, कोर्टात जाऊ पण रायगडवरील वाघ्या कुत्र्याच शिल्प हटवून देणार नाही. पुरातत्व खात्यालाच याचा निर्णय घेण्याचा अधिकार आहे",

This Newspaper Printed, Publisher, Editor and Owned by RAHUL MARUTIRAO WAIKAR and Printed at RAJVEER PRINTERS, Rajmata Jijau Colony, Navgan Collage, Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra) and Published At Dainik LOK AARAMBH OFFICE- House No. 01/03/862, Rajmata Jijau Colony, Navgan College Road,- Beed Dist - Beed Pin-431122 (Maharashtra). Editor- RAHUL MARUTIRAO WAIKAR Mobile: 9272132450 Email : dainiklokaarambh@gmail.com

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक राहुल मारुतीराव वाईकर यांनी राजवीर प्रिंटर्स, राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि.बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक लोक आरंभ कार्यालय, हाऊस नं.०१/०३/८६२० राजमाता जिजाऊ कॉलनी, नवगण कॉलेज रोड, बीड जि. बीड- ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. मो. ९२७२१३२४५०, संपादक: राहुल मारोतीराव वाईकर Email : dainiklokaarambh@gmail.com